यांत्रिक तथा विजतंत्री हे पद स्थलांतरीत
करणेबाबत...

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ
# राहुरी, जि.अहमदनगर

विद्यापीठ निर्णय जा.क्र.एमटीजी-२ (२२४)/२७४ /२०२३ दिनांक- २५/१०/२०२३

**वाचा:-१.** दि.१५/०६/२०२३ रोजी झालेल्या ३३९ व्या कार्यकारी परिषदेतील ठराव क्र.६३/का.प.बै.३३९(१५/०६/२०२३)
२. जा.क्र.प्रशासन/ब-२/यां.तथा वि./ पद स्थलांतर/ २४३२/२०२३ दिनांक- ०७/०९/२०२३

**पार्श्वभुमी**

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे सन २००३ च्या विद्यापीठ आकृतीबंधामध्ये यांत्रिक तथा विजतंत्री हे ०१ पद योजना क्र. २०९ मध्ये कृषिविद्यावेत्ता, प्रादेशिक ऊस व गुळ संशोधन केंद्र, कोल्हापुर यांचे आस्थापनेवर मंजुर आहे.

सदरील मंजुर पदाकरीता संबंधीत कार्यालयाच्या अधिनस्त पदासंबंधित पुरेसे काम उपलब्ध नसल्याने सदर पदावरील कर्मचा-याच्या सेवा सन २०११ पासुन मध्यवर्ती परिसर, राहुरी येथे संचित केल्याचे निदर्शनास येते. विद्यापीठ अभियंता, कार्यालयाकडून मध्यवर्ती परिसर, राहुरी येथील विविध कार्यालयातील जनरेटर व इतर यंत्राचे दुरुस्ती, देखभाल, विद्युतीकरणाची व ऐनवेळी उद्भवणारी कामे कुशल कर्मचारी नसल्याने खाजगी ठेकेदाराकडून करुन घ्यावी लागत आहेत. त्यामुळे यांत्रिक तथा विजतंत्री हे पद स्थलांतरित करुन मिळणेबाबत विनंती करण्यात आलेली होती. दैनंदिन उद्भवणा-या कामकाजातील अडचणी सोडविण्यास व विद्यापीठाचे होणारे आर्थिक नुकसान कमी करण्याच्या दृष्टीने सदरील पद विद्यापीठ अभियंता यांच्या अधिनस्त स्थलांतरीत करुन मिळणेबाबत पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

**विद्यापीठ निर्णय:**

प्रादेशिक ऊस व गुळ संशोधन केंद्र, कोल्हापुर येथील योजना क्र.२०९ मंजुर असलेल्या यांत्रिक तथा विजतंत्री हया पदाकरीता तेथे पुरेसे काम उपलब्ध नाही.

मध्यवर्ती परिसरातील यंत्रे दुरुस्तीची देखभाल व विद्युतीकरणाचे तसेच जनरेटर व इतर ऐनवेळी उद्भवणा-या विद्युतविषयक कामकाजाकरीता नियमित आस्थापनेवर कुशल कर्मचारी उपलब्ध नसल्याने दैनंदिन उद्भवणा-या कामकाजातील अडचणींना तसेच त्यामुळे होणा-या आर्थिक नुकसान कमी करणेच्या दृष्टिने संबंधीत कुशल कर्मचा-याची सेवा अत्यावश्यक ठरते.

त्याअनुषंगाने, मध्यवर्ती परिसरातील विद्युत कामकाजासंबंधीची निकड लक्षात घेता यांत्रिक तथा विजतंत्री हे पद प्रादेशिक ऊस व गुळ संशोधन केंद्र, कोल्हापुर येथून विद्यापीठ अभियंता, मफुकृवि, राहुरी यांचे योजना क्र.१७ मध्ये स्थलांतरीत करणेच्या विषयास संदर्भ क्र.१ अन्वये कार्यकारी परिषदेच्या ३३९ व्या तसेच ३४० व्या बैठकीतील सुधारीत निर्णयानुसार तसा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेस सादर करण्यात येत असून त्यानुसार मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार, सदरील पदाच्या स्थलांतरणास सुधारीत आकृतीबंधात तसा बदल मंजुर करण्यास मा. कुलगुरु यांची मान्यता प्रदान करण्यात येत आहे

**स्वाक्षरीत /-**
**(विठ्ठल शिर्के)**
**कुलसचिव**

प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव -

१. मा. संचालक, संशोधन/ विस्तार शिक्षण, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
२. मा. अधिष्ठाता (कृषि) तथा संचालक शिक्षण, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
३. सहयोगी अधिष्ठाता (सर्व)
४. विभाग प्रमुख (सर्व)
५. सहयोगी संशोधन संचालक (सर्व)
६. प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय (सर्व)
७. प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र/ प्रकल्प (सर्व).
८. नियंत्रक/ विद्यापीठ अभियंता/ विद्यापीठ ग्रंथपाल/ नियोजन अधिकरी, मफुकृवि, राहुरी.
९. उपकुलसचिव (प्रशासन)/ (विद्या), मफुकृवि, राहुरी
१०. अधिदान व लेखाधिकारी/ सहाय्यक नियंत्रक/सहाय्यक कुलसचिव (सर्व)
११. मा.कुलगुरु/ कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक, मफुकृवि, राहुरी

प्रत माहितीस्तव- मा.सहासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, १३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे -४

(राजू ध. पाटील)
उपकुलसचिव (प्रशासन)